# MAHARASHTRA STATE COUNCIL
## FOR OCCUPATIONAL THERAPY & PHYSIOTHERAPY, MUMBAI
## महाराष्ट्र राज्य व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषद, मुंबई

**St. George'sHospital, Behind C.S.T. Station, Ph. 22620408**
**Email ID - otptcouncil@gmail.com**


जा.क्र.ओटीपीटी/परिषद/१४७८/१८ दिनांक :-१८ जुलै, २०१९

### सुचना

**विषयः-** विद्यार्थ्यांच्या परिषदेतील नोंदणी बाबत

खालील महाविद्यालयामधुन/संस्थेमधुन भौतिकोपचार, व्यवसायोपचार पदवी तसेच अतिरिक्त अर्हता प्राप्त करुन ज्या विदयार्थ्यांनी परिषदेच्या कार्यालयामध्ये नोंदणीसाठी अर्ज केलेले आहेत अशा विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, खालील महाविद्यालयाकडे/संस्थेकडे परिषदेला त्यांच्याकडून आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांची/शासन मंजुरीची परिषदेने मागणी करुन सुध्दा महाविद्यालयाने अद्याप शासन मंजुरी व इतर कागदपत्रांची पुर्तता केलेली नाही. सन २००४ चा महाराष्ट्र राज्य व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषद अधिनियम क्रमांक २ मधील कलम १७ व १९ नुसार सदरील महाविद्यालयांना/संस्थांना व्यवसायोपचार, भौतिकोपचारची पदवी / अतिरीक्त अर्हता, तसेच वाढीव क्षमता यासाठी राज्य शासनाची परवानगी घेणे आवश्यक/बंधनकारक आहे.

शासन मंजुरीचे आदेश महाविद्यालयाकडुन परिषदेस प्राप्त झाल्यानंतरच त्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे नोंदणी प्रमाणपत्र त्या विद्यार्थ्यांना देण्यात यावेत,असे परिषदेने ठरविले आहे .

| Sr.No | Institute | University | Qualification |
|---|---|---|---|
| 1 | MGM University School of Physiotherapy, Navi Mumbai | MGM Deemed to be University, Navi Mumbai | 1) B.P.Th<br>2) M.P.T / M.P.Th |
| 2 | MGM University School of Physiotherapy, Aurangabad | MGM Deemed to be University, Navi Mumbai | 1) B.P.Th<br>2) M.P.T / M.P.Th |
| 3 | Dr.D.Y.Patil University School of Physiotherapy, Navi Mumbai | D.Y.Patil Deemed to be University, Navi Mumbai | 1) B.P.Th<br>2) M.P.T / M.P.Th |
| 4 | A.P.J Abdul Kalam Physiotherapy College, Loni (BK), Ahmednagr | PIMS Deemed to be University, Loni, Ahmednagar | 1) B.P.Th<br>2) M.P.T / M.P.Th |
| 5 | Dr.D.Y.Patil College of Physiotherapy, Pune. | D.Y.Patil Deemed to be University, Pune | M.P.T / M.P.Th |
| 6 | Datta Meghe Physiotherapy College, Sawangi Wardha | DMIMS Deemed to be University,Nagpur. | M.P.T / M.P.Th (Cardio-respiratory) |

**उपरोक्त महाविद्यालयामधुन/संस्थेमधुन पदवी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना परिषदेचे पुढील निर्देश/आदेश प्राप्त होईपर्यंत नोंदणी प्रमाणपत्र तुर्त/सध्या मिळणार नाहीत याची नोंद घ्यावी.**

परिषदेचे निर्देश/आदेश प्राप्त होताच परिषदेच्या याच संकेतस्थळावर तशी सुचना प्रसिद्ध करण्यात येईल याची नोंद घ्यावी..

**प्रबंधक**
**महाराष्ट्र राज्य व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषद,**
**मुंबई**

प्रत,
१) प्राचार्य, उपरोक्त सर्व संबंधित महाविद्यालय/संस्था
२) सुचना फलक